**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 27.10.2024** **वार – रविवार**

---

**पुणे उमेदवार**

विधानसभा निवडणुकीसाठी पुण्यातल्या काही जागांवर विविध पक्षांनी उमेदवारांची नावं जाहीर केली आहेत. कोथरूड विधानसभेच्या जागेसाठी उद्धव बाळासाहेब ठाकरे गटानं माजी आमदार चंद्रकांत मोकाटे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. इथं तिरंगी लढत होण्याचा अंदाज आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदच्चंद्र पवार पक्षाकडून खडकवासला मतदारसंघातून सचिन दोडके यांना तर भाजपकडून विद्यमान आमदार भीमराव तापकीर यांना, मनसेकडून मयुरेश वांजळे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. चिंचवडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदच्चंद्र पवार पक्षाकडून राहुल कलाटे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे.

पुण्यातला सर्वात चर्चेतल्या कसबा मतदारसंघात भाजपकडून पुन्हा एकदा हेमंत रासने यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. याच मतदारसंघात काँग्रेसने पुन्हा एकदा रवींद्र धंगेकर यांना तिकीट दिलं आहे. पुणे कॅन्टोन्मेंट मतदारसंघातून भाजपने सुनील कांबळे यांना पुन्हा संधी दिली आहे.

**पिंपरी मतदार**

विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभुमीवर, पिंपरी मतदारसंघातल्या 206 क्रमांकाच्या कार्यालयाकडून गांधीनगर इथं मतदान जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मतदानात सहभागी होण्याची शपथ घेत 100 टक्के मतदान करण्याचा निर्धार यावेळी उपस्थित नागरिकांनी केला.

**पिंपरी मतदार**

पिंपळे सौदागर इथंही लिनिअर गार्डनर आणि ज्येष्ठ नागरिक संघाच्या दैनंदिन कार्यशाळेत मतदार जनजागृती अभियान राबवण्यात आलं. करूया योगा हो मतदार राजा जागा हा उपक्रम यावेळी राबवण्यात आला. महापालिकेच्या स्वीप कक्षामार्फत चिंचवड येथील एलप्रो मॉल येथे मतदार जनजागृती अभियान राबविण्यात आले. यावेळी येत्या विधानसभा निवडणुकीत मतदान करण्याबाबत नागरिकांनी शपथ घेतली.

**रबी पेरण्या**

पुणे जिल्ह्यात आतापर्यंत 56 हजार 345 हेक्टरवर रबीच्या पेरण्या पूर्ण झाल्याची माहिती जिल्हा कृषी अधीक्षक संजय काचोळे यांनी दिली आहे. जिल्ह्यात रबी हंगाम महत्त्वाचा असून, रबी पेरणी होणाऱ्या तालुक्यांमध्ये पावसाची स्थिती समाधानकारक राहिल्यानं जिल्ह्यात पेरण्यांना वेग आला असल्याचं सांगून ते म्हणाले,  गेल्या वर्षी पावसाचं प्रमाण कमी असल्यानं खरीप हंगामाच्या उत्पादनात घट झाली होती. त्या तुलनेत यंदा पाण्याची मुबलकता असल्याचंही काचोळे म्हणाले.

**जन सेवा पुरस्कार**

जनसेवा सहकारी बँकेच्या वतीनं, देण्यात येणारा जनसेवा पुरस्कार यंदा निरामय संस्थेला देण्यात आला. वंचित समाजाच्या आरोग्य आणि सक्षमतेसाठी ही संस्था कार्यरत आहे. एक लाख रुपये, सन्मानचिन्ह, मानपत्र असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. ज्येष्ठ हृदयरोगतज्ज्ञ जगदीश हिरेमठ यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यावेळी योग्य जीवनशैलीचा अवलंब केल्यास निरामय जीवन जगता येत असल्याचं प्रतिपादन त्यांनी यावेळी केलं. याप्रसंगी जनसेवा बँकेच्या ॲपचं अनावरणही करण्यात आलं.

**दिवाळी सुरूवात**

वर्षातल्या सर्वात मोठ्या आणि सर्वांच्या लाडक्या प्रकाशोत्सवाला, दिवाळीला उद्या गुरूद्वादशी म्हणजेच वसुबारसेपासून दीपोत्सवाला प्रारंभ होत असून, पुढील रविवारपर्यंत हा सण साजरा होणार आहे. उद्या, गाय वासराची पूजा करून दिवाळीची सुरुवात होईल. यानिमित्त, पुण्यात मुख्य बाजारपेठेत लक्ष्मी रस्त्यावर लोकांची खरेदीची लगबग दिसून येत आहे. तसंच ठिकठिकाणच्या फटाक्यांच्या स्टॉलवरही बच्चेकंपनीची गर्दी दिसू लागली आहे.

**कातकरी दिवाळी**

पुण्यातल्या जय गणेश व्यासपीठातल्या गणेश मंडळांनी मुळशी तालुक्यातल्या 35 कातकरी कुटुंबासह दिवाळी साजरी करण्याचा उपक्रम राबवला. साईनाथ मंडळ ट्रस्ट, मॉडेल कॉलनीतलं अजिंक्य मित्र मंडळ यांच्या वतीनं पिरंगुट, गाढववाडी आणि कुंभारवाडी इथल्या 35 कुटुंबांना फराळाच्या पदार्थांसह आकाशदिवा, पणत्या, फटाके कपडे भेट दिले.

**दिवाळी पहाट**

दिवाळी आणि पहाट मैफिलीचं एक सुरेल नातं आहे. याही वर्षी दिवाळीत पुण्यात विविध संस्थांच्या वतीनं सुरेल मैफलींचं आयोजन करण्यात आलं आहे. या वर्षी त्यात संध्याकाळच्या मैफिलींचीही भर पडली आहे. विविध ठिकाणी गीत, संगीताच्या मैफिली रसिकांना अनुभवता येणार आहेत.

**भाजीपाला**

गुलटेकडीच्या पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीत राज्यासह कर्नाटक, गुजरात, तामिळनाडू, उत्तरप्रदेश राज्यातून 90 ट्रक फळभाज्यांची आवक झाली. मागणी वाढल्यानं कोबी, गवार, मटार, वांगी आणि भुईमूग फळभाज्या तसंच कोथिंबीर, मेथी, शेपू, चाकवत, करडई या पालेभाज्यांच्या भावातही वाढ झाली आहे. फळबाजारात मागणी कमी झाल्यानं पेरू, लिंबाच्या भावात घसरण झाली आहे. दिवाळीच्या पार्श्वभुमीवर फुल बाजारात फुलांच्या भावात दुपटीनं वाढ झाली आहे.

**हवामान**

आज पुण्यात दिवसभर आकाश निरभ्र राहिलं. सकाळी पुणेकरांना धुक्याचा अनुभव घेता आला. आज कमाल 34 अंश तर किमान तापमान 17 पूर्णांक 4 अंश नोंदवलं गेलं. उद्याही असेच हवामान राहिल असा अंदाज पुणे वेधशाळेन वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार**.